
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | मंगळवार, 3 मार्च 2026 | अंक क्र. 283 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# धनंजय मुंडेंवर लावलेले सर्व आरोप न्यायव्यवस्थेपुढे टिकले नाहीत

## न्यायालयीन लढाईत धनंजय मुंडेंचा लोकायुक्तांचा निकाल धनंजय मुंडेंना दिलासा !

■ मुंबई (वृत्तसंस्था)

राज्याचे माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आ. धनंजय मुंडे यांचा आणखी एका न्यायालयीन लढाईत विजय झाला असून, कृषी साहित्य खरेदी, ऑफिस ऑफ प्रॉफिट यासह वेगवेगळ्या आरोप करणाऱ्या अंजली दमानिया यांचे सर्व आरोप राज्य लोक आयुक्तांनी फेटाळून लावले आहेत.

धनंजय मुंडे हे राज्याचे कृषिमंत्री असताना एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी योजनेंतर्गत विशेष कृती कार्यक्रम राबवून त्याअंतर्गत नॅनो खते, कापूस बॅग, बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप आदी साहित्य खरेदी करण्यात आले, त्यामध्ये अनियमितता करून शेकडो कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला होता. या संदर्भात माननीय मुंबई उच्च न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्या बाजूने निकाल दिला व संबंधितांचे आरोप फेटाळून लावल्यानंतर अंजली दमानिया यांनी राज्य लोक आयुक्तांकडे याबाबत तक्रार केली होती.

लोकायुक्त यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे संपूर्णतः ऐकून घेऊन, सर्वोच्च न्यायालयाचे विविध निकाल तसेच संविधानिक तरतुदींचा अभ्यास करून माननीय मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल हा स्वयंस्पष्ट असून या प्रकरणातील आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसून सदर आरोप फेटाळून लावत असल्याचे आपल्या निकालामध्ये स्पष्ट केले आहे.

उच्च न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्या विरोधातील पडगिलवार यांच्यासह विविध जनहित याचिका यांच्यावरती एकत्रित निकाल देताना हे आरोप केवळ व्यावसायिक

**अंजली दमानियांचे सर्वच आरोप लोकायुक्तांनी लावले फेटाळून**

**कृषी साहित्य खरेदीबाबतचा उच्च न्यायालयाचा निकाल स्वयंस्पष्ट; लोकायुक्तांचे निरीक्षण**

दृष्टिकोनातून व खोट्या पुराव्यांच्या आधारे केलेले असून राज्य शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयावर व्यवसायिक दृष्टीने खोटी माहिती समोर आणून शंका उपस्थित करणे हे कायद्याला धरून नसल्याचे स्पष्ट करत, सर्व याचिका फेटाळून लावल्या होत्या. तसेच याचिकाकर्त्यांना एक लाख रुपयांचा दंड ठोठावला होता.

त्यानंतर संबंधित याचिकाकर्त्यांना जर निकाल मान्य नसता तर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात या विरोधात अपील करायला हवे होते मात्र त्यांनी अद्याप अपील न करता दंड भरला; याचाच अर्थ याचिका करते यांना सुद्धा उच्च

**महत्त्वाचे निकाल**

■ **कृषी मंत्री असताना कृषी साहित्य खरेदीबाबत करण्यात आलेल्या आरोपात उच्च न्यायालय त्यापाठोपाठ आता लोकायुक्त यांनी देखील मुंडेंच्या बाजूने निकाल दिला. पीकविमा संदर्भात कोणताही घोटाळा झाला नसून राज्यात मागील दहा वर्षातील सर्वाधिक पीकविमा धनंजय मुंडे यांच्या कृषिमंत्री कार्यकाळात महाराष्ट्राला मिळाला, असे स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ सभागृहात घोषित केले. ऑफिस ऑफ प्रॉफिट संदर्भाने केलेले आरोप पूर्णपणे खोटे असल्याचे आजच्या निकालाने स्पष्ट झाले.**

न्यायालयाने दिलेला निकाल मान्य होता. उच्च न्यायालयाने या निकालामध्ये नोंदविलेली निरीक्षणे ही स्वयंस्पष्ट, निर्णायक व शासनाच्या धोरणाला अनुसरून असल्याने तसेच याचिकाकर्त्या अंजली दमानिया यांच्याकडे संबंधित याचिकेमध्ये जोडलेल्या बाबींव्यतिरिक्त, बनावट पुरावे असून कुठलाही ठोस पुरावा किंवा दखल घेण्यायोग्य काहीही नसल्याने यामध्ये आणखी वेगळी सुनावणी घेण्याचा कोणताही मुद्दा शिल्लक राहत नाही, असेही लोकायुक्तांनी आपल्या निकालात स्पष्ट केले आहे. कृषी साहित्य खरेदी सोबतच अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात ऑफिस प्रॉफिट सह विविध आरोप केले



होते. यासंदर्भात धनंजय मुंडे यांचे वकील श्री शार्दुल सिंह यांनी धनंजय मुंडे यांची बाजू मांडताना खासदार जया बच्चन यांच्या संबंधातील सर्वोच्च न्यायालयाच्या एका खटल्याचा संदर्भ देत ऑफिसर प्रॉफिट बाबत लोकायुक्तांकडे देण्यात आलेली माहिती ही चुकीची व अर्धवट असल्याचे नमूद केले.

या प्रकरणात देखील संविधानातील ठराविक काही कलमे, लोकप्रतिनिधीत्व कायदा, लोकप्रतिनिधींच्या हक्कांचे संरक्षण यांसह सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास केला असून, लोक आयुक्तांच्या अखत्यारीतील कोणताही ऑफिस ऑफ प्रॉफिटचा मुद्दा किंवा त्या अनुषंगाने कुठलाही आरोप सिद्ध होत नाही; तसेच याचिकाकर्ते अंजली दमानिया यांनी याबाबत देखील कुठलाही महत्त्वाचा नवीन पुरावा त्यांच्या पुरवणी जबाबात देखील सादर केलेला नाही. त्यामुळे ऑफिस ऑफ प्रॉफिट चा मुद्दा हा देखील निकाली काढला असून, त्यातही धनंजय मुंडे यांना क्लीन चीट देण्यात आली आहे.

दरम्यान मागील एका वर्षापासून अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात जे काही आरोप केले ते उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतर आता लोकायुक्तांनी देखील सदर आरोप फेटाळून लावले असल्याने, अंजली दमानिया यांच्या केवळ तोंडाच्या वाफा व धनंजय मुंडे यांच्या बदनामीचा प्रयत्न होता, हे सिद्ध झाले आहे.

दरम्यान धनंजय मुंडे यांच्या वरती मागील काही महिन्यात वेगवेगळ्या प्रकारचे अनेक आरोप करण्यात आले, त्यावरून त्यांची बदनामी करण्याची एकही संधी विरोधकांनी सोडली नाही, मात्र मुंडे यांच्या विरोधातील एक एक आरोप खोटा सिद्ध होण्याची मालिका देखील सुरू असून आज त्यात या निकालाने महत्वाची भर पडली असेच म्हणावे लागेल.

# अंबाजोगाई शहरात गुटखा साठ्यावर पोलिसांचा छापा; ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**अंबाजोगाई :**

**Pमहाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व पानमसाल्याच्या विक्रीवर अंबाजोगाई शहर पोलिसांनी मोठी कारवाई करत सुमारे ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ८४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १२३, २७४, २७५, २२३ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.**

**दि. १ मार्च २०२६ रोजी पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे शेपवाडी परिसरातील इसम रवीकिरण ज्योतीबा शेप (वय २८) यांच्या घरावर छापा टाकण्यात आला. छाप्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला ०१ विमल पानमसाला, त्याचे तंबाखूचे पाऊच व डोरेक्स्टर पानमसाला असा एकूण ५५,००० रुपयांचा माल आढळून आला. पोलिसांनी तत्काळ मुद्देमाल जप्त करून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.**

**ही कारवाई पोलीस अधीक्षक बीड श्रीमती चेतना तिडके-उमर, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई श्री. रक्षेकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच पोलीस निरीक्षक अंबाजोगाई शहर यांच्या नेतृत्वाखाली पो.उपनिरीक्षक शरद जोंधळे, पो.उपनिरीक्षक शिंदे, पोलीस कर्मचारी तेजस वाहुळे, अमोल गायकवाड, सुशांत गायकवाड, भागवत नागरगोजे, युवराज राठोड यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिंदे करत आहेत.**

**शहरात प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीविरोधात पोलिसांची कारवाई सुरूच राहणार असल्याचे संकेत या कारवाईतून मिळाले आहेत.**



# शेती आणि वारकरी संस्कृती संवर्धन करणारा कीर्तन महोत्सव : पत्रकार विलास बडे

## हक्कासाठी लढण्याची शिकवण संतांची देण

■ परळी / प्रतिनिधी

ज्या प्रमाणे वारकऱ्यांना विठ्ठलाच्या भक्तीची आस असते त्याच प्रमाणे शेतकऱ्यांला त्याच्या कष्टाची पीक येईल की नाही? शेतमालाला भाव मिळेल का नाही हे देखील माहिती नसताना देखील शेतीची आस असणारी भक्ती असते यामुळे शेतकरी आणि वारकरी हे वेगळे नसून एकच आहेत. या उद्देशाने शेतकरी आणि वारकरी यांचे जतन, संवर्धन करणारा हा कीर्तन महोत्सव असून शेतकऱ्यांनी बोलण्याचे, अन्याया विरोधात आवाज उठवायची शिकवण हे संतांच्या विचाराने दिलेली असल्याने एकजुटीने हक्कासाठी लढले पाहिजे असे प्रतिपादन पत्रकार विलास बडे यांनी केले. गाव समूहाच्या शेतकरी कीर्तन महोत्सवात शेती, माती आणि माणूस परिसंवादाच्या दुसऱ्या दिवशी ते प्रमुख वक्ते म्हणून तर कीर्तनकार हभप अविनाश महाजन भरती, सह्याद्री देवराई प्रकल्पाचे किशोर चाटे, सुशील गोटे हे संत विचार मंथन मंचावर उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्नावर आपल्या सडेतोड लेखणीतून, बडे मुद्दे सारख्या मंचावरून प्रसार माध्यमातून शेतकऱ्यांची व्यथा चव्हाट्यावर आणणारे पत्रकार विलास बडे पुढे बोलताना म्हणाले की, समाजात जाती-धर्माच्या भित्तीने समाज दुभंगाला असताना देखील "मढे झाकोनिया करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लवलाहो ही ।। "

या संत तुकोबारायांच्या अभंगानुसार शेतकरी ही एकच जात आहे मात्र धोरणकर्ते शेतकऱ्यांना त्यांच्या मूलभूत प्रश्नापासून दूर ठेवण्यासाठी जाती-धर्मात द्वेष निर्माण करण्याचे धोरणात्मक काम जोमाने करत आहेत. 12 व्या शतकापासून अनेक संतांनी सर्वधर्म समभावाची रुजवन करण्यासाठी



देह झिजविले, महाराष्ट्राची खरी संस्कृती शेतकरी आणि वारकरी असताना शेतकऱ्यांना शिक्षण, आरोग्य, विकास, शेतकऱ्यांच्या पोरांना रोजगार, शेती मालाला हमीभाव या मूलभूत प्रश्नापासून दूर करत जाती-धर्मांची, संत आणि त्याचे विचार जाती-जातीत दुभंगून गावगाडा संपवून माणूस दुभंगल्याने शेतकऱ्यांची अवस्था पोतराजा सारखी होऊन अस्मानी आणि सुलतानी फटके पाठीवर सहन करावे लागत आहेत. या ही परिस्थितीत शेतकऱ्यांची पोर आपल्या क्रयशक्तीचा वापर हा राजकीय स्वार्थापोटी करणाऱ्या शक्ती ओळखून आपल्या जन्मदात्या माता-पित्याचा उद्धाराकरिता करण्यासाठी संतांचे विचार उपयुक्त असून या शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या स्वरूपात शेतकऱ्यांना शेतकरी पुत्रांना जीवन जगण्याची उभारी देत आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या पिकाला भाव, पाणी आणि निसर्गाची अवकृपा यांच्याशी कायम संघर्ष करावा लागत असून जाती-धर्माचे भुरसटलेले विचार सोडून एकजुटीने हक्कासाठी लढायला शिकले पाहिजे, शेतकऱ्यांनी आपल्या एकजुटीची ताकद ओळखून आपला हक्क मिळवण्यासाठी लढले पाहिजे, तरुण शेतकऱ्यांनी शेतीसोबतच जोड व्यवसाय, प्रक्रिया उद्योगाकडे वळले पाहिजे असे सांगितले. या दुसऱ्या दिवशीच्या संत विचार मंथनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड.अजय बुरांडे यांनी करत स्वतः शेती करत वारकरी संस्कृती जपत पहिले कर्जमाफी देणारे जगतगुरु तुकोबाराया यांचा बीजेनिमित होणारे हे शेतकरी कीर्तन महोत्सव हा केवळ सोहळा नसून कृतिशील काम करणारे, शेती आणि संत विचार समाजात रुजविण्यासाठी प्रयत्न करणारे एक माध्यम असल्याचे सांगितले. या प्रसंगी हभप श्यामसुंदर सोन्नर महाराज यांनी शेतकऱ्यांची एकजुट काय करून दाखवतो शकते हे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध आंदोलनाला मिळालेल्या यशाचे दाखले देत विषद केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विशाल देशमुख तर ऋणव्यक्त सुभाष सोळंके यांनी केले. संत विचार मंथनानंतर हभप अविनाश महाराज भारती यांचे कीर्तन संपन्न झाले.

600 किलोमीटर खांद्यावर नांगर घेऊन शेतकऱ्यांच्या आंदोलनात सहभागी शेतकऱ्याचा संयोजकाकडून सन्मान दुसऱ्या दिवशी पंचक्रोशीतील औरंगपूर, खामगाव व पाडोळी या तीन गावांचा कीर्तन महोत्सवात सहभाग दुसऱ्या दिवशी सकाळी निमला, दुपारी गर्देवाडी तर रात्री आमला ग्रामस्थांकडून पंगतीचे आयोजन.

# झेडपीच्या बांधकाम विभागात कोट्यवधींचा घोटाळा उघड

## अधिकारी-कंत्राटदार संगनमत; लाखो रुपयांची तफावत, चौकशी समितीचा ठपका

■ **घोटाळा विशेष वृतांत-**

बीड जिल्हा परिषद (ZP) बांधकाम विभागातील विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे उघड झाले आहे. चौकशी समितीच्या अहवालात लाखो रुपयांची तफावत आढळून आली असून, या प्रकरणी तीन अधिकाऱ्यांसह संबंधित कंत्राटदारांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### काय आहे प्रकरण ?-

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत शासकीय इमारतींची दुरुस्ती, शाळा व अंगणवाडी इमारतींची देखभाल, आरोग्य उपकेंद्रांच्या दुरुस्त्या, तसेच विविध विकासकामे हाती घेण्यात आली होती. या कामांसाठी मंजूर निधी आणि प्रत्यक्ष खर्च यामध्ये मोठी तफावत असल्याची तक्रार पुढे आली. तक्रारीनंतर स्थापन करण्यात आलेल्या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालात मोजमाप पुस्तिका (एमबी), अंदाजपत्रक आणि प्रत्यक्ष काम यामध्ये विसंगती आढळली. काही ठिकाणी काम अपूर्ण असतानाही पूर्णत्व दाखवून बिलांची रक्कम अदा केल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदरील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अखत्यारीत 18 गावे येतात, हे आरोग्य केंद्र डोंगर भागात येत असल्याने लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा दवाखाना उत्यंत महत्त्वाचा आहे परंतू भ्रष्ट अधिकारी आणि बोगस गुत्तेदार यांनी पुर्णपणे लोकांच्या आरोग्याचा विचार न करता बोगस बिल वाटली.गावातील युवकांनी याविरोधात उपोषणाचे हत्यार उपसले,मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी तातडीने चौकशी समिती नेमुन सदरील आरोग्य केंद्रातील भ्रष्टाचारचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

### निकृष्ट दर्जाचे साहित्य वापर

■ **मोजमाप नोंदींमध्ये फेरफार तसेच काही बरीच कामं ही फक्त कागदोपत्री पुर्ण दाखवली गेली या सर्व बाबींमुळे लाखो रुपयांची आर्थिक तफावत निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे.**

### कोणावर कारवाई ?

■ **चौकशी अहवालानंतर संबंधित तीन अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, त्यांच्यासह संबंधित कंत्राटदारांवर प्रशासकीय व फौजदारी कारवाईचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. तसेच, दोषींकडून तफावतीची रक्कम वसूल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गरज भासल्यास गुन्हा दाखल करण्याचीही तयारी प्रशासनाने दर्शविली आहे.**

### फाईल गायब ?

■ **या प्रकरणात आणखी धक्कादायक बाब म्हणजे, कारवाईचे आदेश होताच संबंधित विभागातील काही महत्त्वाच्या फाईल्स उपलब्ध नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे प्रकरण अधिकच संशयास्पद बनले आहे. या संदर्भात स्वतंत्र चौकशीची मागणी होत आहे.**

### प्रशासनाचे म्हणणे

■ जिल्हा परिषद प्रशासनाकडून सांगण्यात आले की, "कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार खपवून घेतला जाणार नाही. चौकशी अहवालानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. शासकीय निधीचा अपव्यय करणाऱ्यांना माफ केले जाणार नाही."

### जनतेत संताप

■ जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणारी कामे ही थेट ग्रामीण भागाच्या विकासाशी निगडित असतात. अशा कामांमध्ये गैरव्यवहार उघड झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दोषींवर तातडीने गुन्हा दाखल करून कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे.

### पुढे काय ?

■ या प्रकरणी पुढील काही दिवसांत अधिकृत निलंबन आदेश, रक्कम वसुलीची प्रक्रिया आणि संभाव्य गुन्हा नोंद होण्याची शक्यता आहे. चौकशीचा कक्ष वाढवून आणखी कामांची तपासणी करण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

### लाखोंची तफावत कशी?

**समितीच्या प्राथमिक निष्कर्षानुसार: अंदाजपत्रकापेक्षा जादा देयके अदा अपूर्ण कामे पूर्ण दाखविणे**




## रंगोत्सव आणि स्त्रीसुरक्षा : होळीमध्ये आवश्यक काळजी : डॉ. सुवर्णा कराड

होळी हा भारतीय संस्कृतीतील आनंद, समता आणि सामाजिक ऐक्याचा सण आहे. रंगांची उधळण, हास्य, संगीत आणि एकत्र येण्याची संधी या सर्वांमुळे होळीचे महत्त्व विशेष आहे. परंतु सणाचा उत्साह जितका महत्त्वाचा आहे, तितकीच सुरक्षिततेची जाणीवही आवश्यक आहे. विशेषतः महिलांसाठी होळी हा केवळ रंगांचा उत्सव नसून सजगतेचा, आत्मसंरक्षणाचा आणि स्वाभिमान जपण्याचा दिवस आहे. सण आनंदाचा असला तरी सुरक्षिततेची काळजी न घेतल्यास तो त्रासदायक ठरू शकतो. त्यामुळे होळी साजरी करताना काही मूलभूत गोष्टींची जाणीव ठेवणे अत्यावश्यक आहे.





सर्वप्रथम आरोग्य आणि त्वचेची काळजी घेणे गरजेचे आहे. बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक रंगांमध्ये रासायनिक घटक असतात. हे रंग त्वचेवर पुरळ, खाज, ॲलर्जी किंवा डोळ्यांची जळजळ निर्माण करू शकतात. केस कोरडे पडणे किंवा तुटणे यासारखे दुष्परिणामही दिसून येतात. त्यामुळे शक्यतो नैसर्गिक, हर्बल किंवा घरगुती रंगांचा वापर करणे अधिक सुरक्षित ठरते. होळी खेळण्यापूर्वी केसांना आणि त्वचेला खोबरेल तेल किंवा बदाम तेल लावल्यास रंगांचा थेट परिणाम कमी होतो. पूर्ण बाह्यांचे, आरामदायी आणि शरीर झाकणारे कपडे परिधान करणे हीदेखील महत्त्वाची खबरदारी आहे. डोळ्यांमध्ये रंग जाणार नाही यासाठी सनग्लासेसचा वापरही उपयुक्त ठरू शकतो.

दुसरी आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे वैयक्तिक सुरक्षितता. होळीच्या नावाखाली काही ठिकाणी मर्यादा ओलांडल्या जातात. "बुरा न मानो, होली है" या वाक्याचा गैरवापर करून अयोग्य स्पर्श, जबरदस्ती किंवा अश्लील टिप्पणी केली जाते. कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन हे केवळ असभ्यता नसून कायद्याने दंडनीय गुन्हा आहे. महिलांनी अशा प्रसंगी शांत राहण्याऐवजी ठामपणे विरोध करणे आवश्यक आहे. "नाही" म्हणण्याचा अधिकार प्रत्येक स्त्रीला आहे आणि तो वापरणे ही कमजोरी नसून आत्मसन्मानाची जाणीव आहे. जर परिस्थिती गंभीर वाटली तर त्वरित कुटुंबीय, मित्रमैत्रिणी किंवा स्थानिक प्रशासनाची मदत घ्यावी. सुरक्षित आणि विश्वासू परिसरातच सण साजरा करणे हितावह ठरते. होळीच्या निमित्ताने मद्यपान आणि भेसळयुक्त पेयांचे प्रमाण वाढते. काही ठिकाणी पेयांमध्ये अज्ञात घटक मिसळले जातात, ज्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अज्ञात व्यक्तीकडून दिलेले पेय स्वीकारू नये. स्वतः तयार केलेले किंवा विश्वासार्ह स्त्रोतांतील पेयच घ्यावे. नशेमुळे निर्णयक्षमता कमी होऊ शकते, ज्याचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. म्हणूनच सजगता आणि संयम हेच सुरक्षिततेचे प्रमुख आधार आहेत. डिजिटल युगात होळीचा आणखी एक पैलू म्हणजे गोपनीयता आणि ऑनलाइन सुरक्षा. सणाच्या दिवशी फोटो आणि व्हिडिओ मोठ्या प्रमाणात काढले जातात आणि सोशल मीडियावर शेअर केले जातात. कोणते फोटो सार्वजनिक करायचे याचा विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. परवानगीशिवाय छायाचित्रण होत असल्यास त्यास स्पष्ट विरोध करावा. चुकीच्या पद्धतीने वापरलेली डिजिटल सामग्री मानसिक आणि सामाजिक त्रासाचे कारण ठरू शकते. त्यामुळे डिजिटल सुरक्षितताही तितकीच महत्त्वाची आहे जितकी प्रत्यक्ष सुरक्षितता.

आरोग्याच्या दृष्टीने काही साध्या गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. डोळ्यांत रंग गेल्यास त्वरित स्वच्छ पाण्याने धुवावे. साबण किंवा रसायनांचा अति वापर टाळावा. त्वचेवर त्रास जाणवल्यास लगेच रंग काढून टाकावा आणि आवश्यक असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. जास्त वेळ ओले कपडे परिधान करून राहू नये, कारण त्यामुळे सर्दी किंवा त्वचेचे विकार होऊ शकतात. सणानंतर कोमट पाण्याने अंघोळ करून त्वचेला मॉइश्चरायझर लावणे उपयुक्त ठरते.

स्त्रीसुरक्षा ही केवळ महिलांची वैयक्तिक जबाबदारी नसून समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. कुटुंबातील पुरुषांनी, मित्रांनी आणि समाजातील प्रत्येकाने स्त्रियांचा सन्मान राखणे हे आपले कर्तव्य मानले पाहिजे. सणाच्या नावाखाली कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन सहन केले जाऊ नये. भारतीय कुटुंबसंस्थेची ताकद ही परस्पर आदर आणि विश्वास यात आहे. होळीच्या निमित्ताने हे मूल्य अधिक दृढ झाले पाहिजे.

महिलांनी आत्मविश्वास आणि सजगता यांचा समतोल साधावा. सणात उत्साहाने सहभागी व्हावे, पण परिस्थितीचे भान ठेवावे. स्वतःच्या मर्यादा स्पष्ट ठेवणे, विश्वासू व्यक्तींशी संपर्कात राहणे आणि आवश्यक असल्यास त्वरित मदत मागणे या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भीतीपेक्षा जागरूकता अधिक प्रभावी ठरते. आत्मसंरक्षणाची प्राथमिक माहिती आणि आपत्कालीन संपर्क क्रमांक जवळ ठेवणेही उपयुक्त ठरते. होळीचा खरा अर्थ समता, स्नेह आणि आनंद यात आहे. रंग तात्पुरते असतात, पण सन्मान आणि सुरक्षिततेची भावना कायमची असते. जर सण मर्यादेत, सजगतेने आणि परस्पर आदराने साजरा केला, तर तो खऱ्या अर्थाने आनंदोत्सव ठरतो. अन्यथा बाह्य रंगांच्या आड असुरक्षिततेची छाया निर्माण होऊ शकते. म्हणूनच या होळीला एक सामूहिक संकल्प करूया — रंग खेळूया, पण मर्यादा जपूया; आनंद साजरा करूया, पण सुरक्षिततेला प्राधान्य देऊया; उत्साहाने सहभागी होऊया, पण स्वाभिमान आणि सन्मान अबाधित ठेवूया. होळीचा रंग त्वचेवरून निघून जाईल, पण सुरक्षिततेची आणि आत्मविश्वासाची भावना कायम राहिली पाहिजे.

■ **डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ,**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)

# उच्च शिक्षित मातंग कुटुंबियांचा बौद्ध पद्धतीने बीडच्या आष्टीत शेकडोच्या उपस्थितीत आदर्श विवाह संपन्न!

**कडा प्रतिनिधी**

आष्टी येथे पवार आणि साठे परिवारातील वधू-वरांचा विवाह सोहळा बौद्ध धम्म विधीनुसार अत्यंत मंगलमय वातावरणात संपन्न झाला. बीड जिल्ह्यातील ता.पाटोदा येथील शिवाजी साठे यांच्या कुटुंबातील द्वारिका शुंभागी यांचा विवाह मौजे भाळवणी (ता. आष्टी) येथील

श्रीरंग पवार यांच्या कुटुंबातील द्वारक विशाल या उच्च शिक्षित वधुवरांचा सर्व बहुजन समाजाने आदर्श घ्यावा असा भगवान बुद्ध,शिव, फुले, शाहू, आंबेडकर,अण्णाभाऊ या महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करुन ,सर्वप्रथम उपस्थित सर्व शेकडो बंधु,भगिनी,वंदनीय भन्ते, बौद्धाचार्य यांनी सामूहिक संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करुन,बालकांनी महापुरुषाचीसुंदर वेशभूषा परिधान करत व तसेच ५०० प्रति डॉ.बाबासाहेबांचे जातीव्यवस्थेचे निर्मूलन वे पुस्तक आणि काही संविधानाच्या प्रतीचे आलेल्या पाहुण्यांना वाटप करुन



बौद्ध पद्धतीने हा शाही आदर्श मंगल परिणय(विवाह)संपन्न झाला या फडणवीस सोहळ्याला चैत्यभूमी, मुंबई येथील भदंत सुमेध बोधी ए. तसेच त्यांचे शिष्य अमरावती येथील भंते आनंद यांनी पारंपरिक बौद्ध धम्म विधीनुसार विवाह संपन्न करून घेतला. बुद्ध व धम्माच्या साक्षीने, पंचशील व त्रिशरण ग्रहण करत समता, करुणा व मानवतेच्या मूल्यांवर आधारित हा मंगल परिणय साजरा करण्यात आला.या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक डी. एस. नरसिंगे, धम्म चळवळीतील कार्यकर्ते प्रबुद्ध साठे, समता सैनिक दलाचे राज्य सचिव अमरसिंह ढाका, लक्ष्मीकांत शिंदे, बीड जिल्हा (प) अध्यक्ष महालिंग निकाळजे, जिल्हा सरचिटणीस सिद्धार्थ जगझाप, जिल्हा बौद्ध पद्धतीने मंगल परिणय संपन्न उपाध्यक्ष (पर्यटन व प्रसार) ॲड. हणुमंत कांबळे, बीड तालुका अध्यक्ष राजेंद्र ससाणे, बीड तालुका संस्कार अध्यक्ष प्रा. गौतम खेमाडे, सेवानिवृत्त ए.पी.आय. भास्कर कांबळे, प्रा. साठे, बाबूराव गालफाडे, समता सैनिक रत्नाकर निकाळजे, अशोकराव निकाळजे,किशोर निकाळजे तसेच ता. आष्टी येथील

भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी,सदस्य व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले की, भारतभूमी ही भगवान बुद्धांची भूमी असून अडीच हजार वर्षांपूर्वी संपूर्ण भारतात बौद्ध धम्माची समतेची परंपरा नांदत होती. बौद्ध धम्मात सामाजिक असमानता, विषमता व शोषणाला थारा नव्हता. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन करून समाजाला समतेचा,स्वाभिमानाचा आणि मानवतेचा मार्ग

दाखवला.आज अनेक कुटुंबे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन बौद्ध पद्धतीने विवाह सोहळे संपन्न करत आहेत. त्याच धर्तीवर आष्टी तालुक्यातील पवार आणि पाटोदा तालुक्यातील साठे कुटुंबीयांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करून समतेचा संदेश देणारा विवाह सोहळा सन्मानाने पार पाडला. या स्तुत्य उपक्रमाबद्दल दोन्ही कुटुंबियांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जैन कलार समाज,लाखनीच्या वतीने स्नेह मिलन सोहळा थाटात साजरा

**रमेश कृष्णराव लांजेवार**

संपूर्ण जैन कलार समाज एकत्र यावा आणि समाजाच्या प्रती आपल्या विचारांचा आदानप्रदान व्हावे या उद्देशाने दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ शनिवारला जैन कलार समाज भवन,खेडेपार रोड,लाखनी येथे स्नेह मिलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता व याप्रसंगी समाजाच्या प्रती महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री मोहित खेडीकर यांनी केले व प्रास्ताविक श्री कृष्णा खेडीकर यांनी केले व यांना साथ दिली चंदन रणदिवे यांनी.यानंतर पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून संत दिनानाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करण्यात आले आणि कार्यक्रमाचा शुभारंभ संगीतमय रुपात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष चंद्रशेखरजी आदमने होते.

यावेळी अनेक मान्यवरांनी समाजाप्रती आपले अनमोल विचार मांडले व लाखनीतील समाज भवनाप्रती व समाजाच्या प्रगतीसाठी सर्वांनीच एकोप्याने पुढाकार घ्यावा व लाखनीतील समाज भवन सुसज्जीत करून त्याचा उपयोग समाजबांधवांनसाठी कसा करता येईल याकडे सर्वांनी आपल्या



भाषणातून मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाला प्रामुख्याने शशिकांत समर्थ, कार्तिक शेंडे, विनोद खानोरकर, राजेश पालांदूरकर, रविकांत हरडे, अक्षय तिडके, सचिन दहिकर, रमेश लांजेवार(पत्रकार), स्वप्नील समर्थ, राजेंद्र वारजुरकर,सौ. माधुरी घोसेकर,सौ.छाया दुरूगकर,सौ.श्वेता अतकर,सौ.संगिता अतकर,अशोक रणदिवे, मंगेश खानोरकर अनिलजी तिडके, अशोक भदाडे, भांडारकर, चंद्रशेखर तिडके,अशोक रणदिवे, सुखरामजी खोब्रागडे, दिलीप मानापुरे, विनोद खेडीकर आदी मान्यवरांची उपस्थिती होते.

यावेळी ऑर्केस्ट्राच्या माध्यमातून देशभक्ती गीत,लावणी व अनेक मनोरंजनात्मक गाण्यांचा स्वाद संपूर्ण समाजबांधवांनी घेतला. आयोजनासाठी जिल्हा समितीचे पदाधिकारी, बांधकाम सभापती संदीप भांडारकर, रवींद्र शेंडे, रूपचंद भांडारकर, राजेंद्र भदाडे, अजिंक्य भांडारकर, राजेश पालांदूरकर, सुनील ढेंगे, सुशील लांजेवार,शिल्पा रणदिवे आदी समाजबांधवांनी सहकार्य केले. संचालन मोहित खेडीकर यांनी तर आभार किशोर लिचडे यांनी मानले. या स्नेह मीलन सोहळ्यासाठी संपूर्ण समाजबंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अयातुल्लाह खामेनेई यांच्या मृत्यूवर मोदी सरकारचे मौन; सोनिया गांधींची जोरदार टीका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष शिगेला पोहचला आहे. महत्त्वाचे म्हणजे 28 फेब्रुवारी रोजी अमेरिकेन इराणवर केलेल्या हल्ल्यात त्यांच्या देशाचे सुप्रीम लीडर अयातुल्ला खामेनेई यांचा मृत्यू झाला. तसेच संरक्षण मंत्री, आर्मी चिफ आणि गार्ड चीफसह अनेक कमांडरही मारले गेले होते. त्यानंतर सोमवारी (02 फेब्रुवारी) अयातुल्ला खामेनेई यांच्या पत्नी मन्सूरेह खोजस्तेह बागेरजादेह यांचाही मृत्यू झाला. मात्र त्यानंतरही मोदी सरकारने मौन धारण केले आहे. याचपार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे.

सोनिया गांधी यांचा एका इंग्रजी वृत्तपत्रात छापून आलेला लेख काँग्रेसने X या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट केला आहे. या लेखात सोनिया गांधी यांनी म्हटले की, 1 मार्च रोजी इराणने





पुष्टी केली की, त्यांच्या सर्वोच्च नेत्याची आदल्या दिवशी अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या हल्ल्यात हत्या करण्यात आली. एका विद्यमान राष्ट्रप्रमुखाची हत्या आजच्या आंतरराष्ट्रीय संबंधांमधील एक मोठी दरी अधोरेखित करते. मात्र या घटनेच्या धक्क्यापलीकडे भारताने प्रतिसाद न देणे हे या दुःखद घटनेला मौन समर्थन असल्याचे दर्शवते. कारण भारत सरकारने या हत्येचा निषेध केला नाही किंवा इराणच्या सार्वभौमत्वाच्या उल्लंघनावर स्पष्ट प्रतिक्रिया देखील दिली नाही. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरुवातीला अमेरिका-इस्रायली हल्ल्यांचा उल्लेख न करता इराणने युएईवर केलेल्या प्रत्युत्तरात्मक हल्ल्यांवर टीका केली. हल्ल्यांपूर्वी ही प्रक्रिया सुरू असताना पंतप्रधानांनी नंतर खोल चिंता व्यक्त केली आणि संवाद व राजनैतिकता सामान्य करण्याचा प्रयत्न केला.

# घुसखोर बांगलादेशींना हद्दपार करण्यासाठी कोम्बिंग ऑपेरेशन राबवणार : गृहराज्यमंत्री

**मुंबई वृत्तसंस्था**

मुंबईत अवैधरित्या बांगलादेशी घुसखोर राहत असून त्यांच्याकडे अवैध कागदपत्रे आढळून येत आहेत. या घुसखोरी बांगलादेशींना हद्दपार करण्यासाठी शासन कोम्बिंग ऑपेरेशन राबवणार का? असा सवाल भाजपा गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून आज (28 फेब्रुवारी) उपस्थित केला. दरेकर यांच्या लक्षवेधीवर गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सकारात्मक उत्तर दिले. या चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे, संजय केणेकर, चित्रा वाघ, अनिल परब, मनिषा कायंदे, निरंजन डावखरे, उमा खापरे यांनी सहभाग घेतला होता.



लक्षवेधीवर बोलताना दरेकर म्हणाले की, मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी बांगलादेशी घुसखोर शिरकाव करताना दिसत आहेत. हा शिरकाव केवळ वस्त्यांपुरता नाही तर व्यवसाय, पदपथ येथे बांगलादेशी प्रवृत्ती घुसताना दिसतात. मुंबई शहरातील 61 भागात संशोधनातून सुमारे 3014 स्थलांतरित नागरिक बांगलादेश व म्यानमार येथील भारतीय ओळखपत्रांसह आढळून आलेत. काहींनी हे दस्तावेज एजंटकडून 7 हजार ते 30 हजार रुपये दराने मिळवले.

अवैध स्थलांतरितांमुळे सुरक्षा, रोजगार आणि प्रशासनासमोर गंभीर आव्हाने निर्माण झालीत. अनेक चर्चासत्रात तज्ज्ञांनी उदाहरणासहित आपली मतं व्यक्त केली. मुंबई पोलिसांनी तीन वर्षात 1758 बांगलादेशी नागरिकांना अटक केली. त्यापैकी 1238 लोकांना हद्दपार करण्यात आले. 25 बांगलादेशी नागरिकांना अँटी टेररिझम सेलने अटक केली.



# पाण्यात बुडलेला मित्राचा जीव वाचवण्याच्या नादात स्वत:चा मृत्यू

**प्रतिनिधी - सोपान पगारे**

आष्टी तालुक्यातील निमगाव बोडखा येथील -- हे शेतामधील शेततळ्यात पडले असताना त्यांचा जीव वाचवण्यासाठी संजय पाटिलबा शेलार, हे गेले असताना त्यांनी मित्राचा जीव वाचवला पण, स्वतःच अचानक बुडून मृत्यू पावल्याची घटना दी. २ मार्च रोजी दुपारी चारच्या दरम्यान समोर आली. संजय शेलार , यांच्या अचानक जाण्याने कुटुंबावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळ आहे, त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे मृत्यू समय त्यांचे वय वर्ष ४५असे होते,अशा दुर्दैवी घटनेमुळे, परिसरात शोकाकुल वातावरण पसरले आहे,त्यांचा अंत्यविधी निमगाव ओळखा येथील स्मशानभूमीत रात्री नऊ वाजता करण्यात आला

# रयत सामाजिक प्रतिष्ठानचा 16वा पुरस्कार वितरण सोहळा 2026 दिमाखदात संपन्न

## सामाजिक, सांस्कृतिक व कला क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव; प्रेरणादायी सोहळा

**बीड | प्रतिनिधी**

सामाजिक, सांस्कृतिक व कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देऊन त्यांचा उत्साह वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने रयत सामाजिक प्रतिष्ठानचा १६वा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात अत्यंत भव्य आणि दिमाखदार वातावरणात उत्साहात पार पडला. यशवंतराव चव्हाण सभागृहात उपस्थित मान्यवर, कलाकार आणि नागरिकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात सन्मानितांचा गौरव करण्यात आला.

हा सोहळा प्रतिष्ठानच्या रोहिणीताई गणेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन व आयोजन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुलोचना माने व शुभांगी माने यांनी केले होते. त्यांच्या नियोजनबद्ध कामामुळे संपूर्ण कार्यक्रमात शिस्त, उत्साह आणि प्रेरणादायी वातावरण अनुभवायला मिळाले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते प्रमुख उपस्थिती राजेश दादा खर्डे (वेसावकर) यांची पारंपरिक कोळी वेशातील दमदार एन्ट्री. त्यांच्या आगमनाने सभागृहात



उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी प्रतिष्ठान अध्यक्षा द्रौपताबाई पठारे, ज्येष्ठ समाजसेवक कैलास दादा पठारे, विठ्ठल मूर्तीवार, मंजू ताई पठारे, अक्षय कलाकार, बंडोपंत सोळुंके, चित्रपट मंडळाचे प्रशांत होर्शीळ सर, समाजसेवक सुशीलजी खटोड, एम.एस. कन्स्ट्रक्शनचे संचालक साथीराम अण्णा ढोले, ओबीसी फाउंडेशनचे लक्ष्मण लटपटे, संतोष अवताडे (अहिल्यानगर) तसेच सोशल मीडियावर लोकप्रिय इंस्टाग्राम रील स्टार लखन चव्हाण, ओम पावले, खंडू तात्या आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. सन्मानितांमध्ये प्रमोद रामदासी, लक्ष्मीकांत रुईकर, आदिम राज बहुउद्देशीय संस्था (रामू मोते), सुशील हरिभाऊ कोळेकर, पसायदान सेवा केंद्रचे गोवर्धन दराडे, सरोज आनंदकर (नागपूर), संगीता माने (क्राईम ब्रँच, मुंबई), प्रमोद गोरक्षनाथ चांदणे, प्राची चांदणी, देविदास उत्तम शेलार आणि नयना रतन कानडे यांचा समावेश होता. सन्मान स्वीकारताना मान्यवरांनी आपल्या कार्याचा अनुभव मांडत सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन गणेश तालखेडकर यांनी केले. प्रतिष्ठानचे सदस्य गणेश माने, किशोर कुलकर्णी, प्रकाश देवा, जाकीर भाई, विकास धोत्रे, गुड्ड्या जोगदंड, महादेव सवाई, मीनाक्षी देवकते, नयना भाकरे, नेहा साबळे व इतर कार्यकर्त्यांनी परिश्रमपूर्वक जबाबदाऱ्या सांभाळून कार्यक्रम यशस्वी केला. भव्य-दिव्य वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले. रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत व्यक्तींना नवी ऊर्जा, आत्मविश्वास आणि प्रेरणा मिळाली असून, समाजकार्याची नवी दिशा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# कार्यकर्त्यांनी सामाजिक जाणिवांची जपणूक करावी.. शैक्षणिक विकासासाठी गट तट बाजूला ठेवावेत : आ.धस

**आष्टी (प्रतिनिधी)**

उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या दुर्दैवी निधनामुळे माझा वाढदिवस साधेपणाने सामाजिक उपक्रम राबवून साजरा करावा असे आवाहन केल्यामुळे माजी सरपंच गंगाधर पडोळे यांनी गरजू शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना सायकल वाटप करून स्तुत्य उपक्रम राबवला आहे कार्यकर्त्यांनी अशाच प्रकारचे सामाजिक भान जपले पाहिजे आणि गावातील शैक्षणिक विकासासाठी गट तट बाजूला ठेवून एकत्र येऊन काम करण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले..

केळसांगवी येथील माजी सरपंच गंगाधर पडोळे यांनी आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने अनावश्यक खर्च टाळून जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिकणाऱ्या गरजू विद्यार्थिनी आणि विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप केले आहे.

या सायकल वितरण समारंभामध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, माझ्या वाढदिवसाच्या उपक्रमामध्ये वाटपाच्या कोणत्याही कार्यक्रमांमध्ये मी स्वतः सहभागी होत नाही परंतु गरजू विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप करणे हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्यामुळे मी या कार्यक्रमास उपस्थित आहे जिल्हा परिषदेच्या शाळा या गोरगरीब विद्यार्थ्यांचे मंदिर आहे आपण सुरुवातीपासूनच जिल्हा परिषद शिक्षण व्यवस्था अत्याधुनिक करण्यासाठी प्रयत्न केले असून गावोगावीच्या जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी शाळा खोल्या साठी निधी उपलब्ध करून दिलेला आहे तसेच जिल्हा परिषदेमार्फत शैक्षणिक गुणवत्ता अभियानासाठी विशेष प्रयत्न केल्यामुळे गुणवत्ता वाढ निश्चितपणे झालेली असून यापुढे आणखी दृश्य परिणाम दिसणार आहेत स्थानिक कार्यकर्त्यांनी गावातील शैक्षणिक वातावरण सुदृढ व्हावे यासाठी गट आणि तट बाजूला ठेवून राजकीय जोडे बाजूला ठेवून शाळेच्या विकासासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे ग्रामीण भागामध्ये सोयीप्रमाणे वस्त्यांमध्ये राहण्याचे प्रमाण वाढल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत येणे जाण्यासाठी सायकलींची अत्यंत आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन हा अत्यंत स्तुत्य उपक्रम गंगाधर पडोळे यांनी राबवला आहे.

जिल्हा परिषद शाळा टिकल्या पाहिजेत, यासाठी समाजाने पुढाकार घेतला पाहिजे. आष्टी तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी गुणवत्ता टिकवून ठेवली असून त्यामुळे पटसंख्याही समाधानकारक आहे. हीच गुणवत्ता पुढेही कायम ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत."सध्याच्या डिजिटल युगाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, "एआयच्या स्पर्धेच्या काळात विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान मिळणे अत्यावश्यक आहे. मात्र पालकांनी मोबाईलचा वापर योग्य कारणांसाठीच मुलांच्या हातात द्यावा. मोबाईलचे फायदे असले तरी त्याचे दुरुपयोगही मोठ्या प्रमाणात होत असल्याने सजग राहणे गरजेचे आहे."

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संयोजक माजी सरपंच गंगाधर पडोळे म्हणाले, "मी दरवर्षी आमदार धस यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करतो यावर्षी सामाजिक उपक्रम राबवायचा निर्णय घेऊन गरीब विद्यार्थिनी विद्यार्थी यांना सायकलींचे वाटप करता आले, याचे समाधान वाटते. पुढेही शैक्षणिक क्षेत्रात असेच उपक्रम राबविण्याचा मानस आहे." यावेळी संदीप खकाळ म्हणाले, आ.धस यांनी विधानभवनात केलेल्या भाषणात सांगितल्याप्रमाणे शेतकऱ्यांनी AI शेतीकडे वळावे,माजी सरपंच गंगा पडोळे यांनी शालेय विध्यार्थ्यांना सायकल वाटप करून स्तुत्य उपक्रम राबिविला आहे. यावेळी

प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांचे समायोजित भाषणे झाली या कार्यक्रमास भाजपा तालुकाध्यक्ष रमेश गावडे, जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, संदीप खकाळ, अजित घुले, राम धुमाळ, बिभीषण पडोळे, ॲड. बाळासाहेब मोरे, दीपक सोनवणे, गौतम आजबे,चेअरमन विठ्ठल शेबडे,माजी सरपंच महादेव




पडोळे, माजी सरपंच राम धुमाळ,पोपट नरवडे,अरुण पडोळे,गोरख सोनवणे,नवनाथ वाघुले,अंगद पडोळे,रामेश्वर पडोळे,बीबीशन पडोळे,बाळासाहेब पडोळे,बाबासाहेब पडोळे,अप्पासाहेब पडोळे,बाबासाहेब पडोळे,महादेव पडोळे, एकनाथ पडोळे,शिवदास पडोळे,सचिन पडोळे, पत्रकार प्रविण पोकळे, पत्रकार गणेश दळवी,पत्रकार सचिन रानडे,पत्रकार अविशांत कुमकर,शरद गर्जे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक जगन्नाथ भगत, श्रीमती अशा ठाकर, जया चौधरी, सुनिता वाळके, सुप्रिया हिंगे, शहाजी तोतरे, संदीप जगताप यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक जे. एस. भगत यांनी मानले. केळसांगवी येथे पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.

# महागाव नगरपंचायतीच्या कारभारात शिस्त आणि वेग आणण्यासाठी नगराध्यक्षा रंजना आडे यांची आज सकाळी धडक

## " नगराध्यक्ष रंजना आडे ॲक्शन मोडवर" पहिल्याच दिवशी 7 बेशिस्त कर्मचाऱ्यांना शॉकाज नोटीस

**प्रतिनिधी महागांव**

महागांव नगरपंचायतीच्या तपासणी करत प्रशासनाला नगराध्यक्ष रंजना आडे यांचा स्पष्ट संदेश दिला कामात कसूर चालणार नाही नगर अध्यक्षाची सकाळीच ॲक्शन मोडवर इंट्री करून पहिल्याच दिवशी 7 बेशिस्त कर्मचाऱ्यांना शॉकाज नोटीस

आज सकाळी नेमक्या 9.50 वाजता नगराध्यक्षांनी महागाव नगरपंचायतीत अचानक भेट देत कार्यालयीन कामकाजाची पाहणी केली. 10.10 वाजता उपस्थिती मस्टर स्वतः ताब्यात घेत उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना कडक ताकीद देण्यात आली.

शिस्तबद्ध कामकाज हाच विकासाचा पाया आहे असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.हलचल रजिस्टर अनिवार्य कार्यालयीन कामानिमित्त बाहेर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांनी हलचल रजिस्टरमध्ये वेळ व कारण नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे. नागरिकांची कामे प्रलंबित राहू नयेत, यासाठी पारदर्शकता आणि जबाबदारीवर भर देण्यात आला. नगराध्यक्षांनी विकासाच्या दृष्टीने काही महत्त्वपूर्ण सूचना दिल्या महागाव नगरपंचायतीसाठी स्वतंत्र प्रशासकीय इमारतीचा प्रस्ताव प्राधान्याने राबविणे अग्निशामन दलासाठी कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया गतीमान करणे ॲम्बुलन्स सेवेसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करणे अमृत जल योजनेअंतर्गत वाढीव पाणीपुरवठ्याची प्रभावी अंमलबजावणी गावातील साचलेला कचरा तात्काळ हटविण्याचे आदेश नागरिकांच्या हितासाठी ठोस पावले नगराध्यक्ष रंजना आडे यांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे नगरपंचायतीच्या कामकाजात शिस्त येणार असून नागरिकांना अधिक जलद आणि दर्जेदार सेवा मिळणार असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.महागावच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांचा समन्वय




अधिक मजबूत करण्याचा निर्धार नगराध्यक्षांनी व माजी उपनगराध्यक्ष सुरेश पाटील नरवाडे यांनी व्यक्त केला आहे.नागरिकांचा विश्वास आणि विकासाची गती हेच आमचे ध्येय असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला यावेळी नेते रामरावजी पाटील नरवाडे, उपाध्यक्ष प्रमोद उर्फ शाखा भरवाडे, सुरेश पाटील नरवाडे भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष निलेश पाटील नरवाडे, दीपक मामा आडे, नारायण शिरबिरे जयश्री नरवाडे , सुभाषराव नरवाडे, विशाल पांडे, परवेज सुरैया, जयश्री इंगोले, शिवाजीराव डाखोरे आदी मान्यवर उपस्थित होते. आ.किसनरावजी वानखेडे यांनी महागाव नगरपंचायत कार्यालय येथे नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. रंजना दीपक आडे यांचा सत्कार करून महागाव शहराच्या विकासासाठी आवश्यक त्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

महागाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगरपंचायतीला निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, असे स्पष्ट करत आमदार वानखेडे म्हणाले की, "महागाव शहर सुंदर, सुजलाम-सुफलाम आणि आदर्श शहर बनवण्यासाठी आमदार म्हणून मी आवश्यक ती सर्वतोपरी मदत करण्यास कटिबद्ध असल्याचे आमदार वानखेडे यांनी बोलता वेळेस सांगितले.

# छत्रपती शिवरायांचे धैर्य, शौर्य अन् न्यायप्रियता आजही प्रेरणादायी : डॉ . सिद्धार्थ तायडे

## ज्ञानज्योत गुरुकुलातून कार्यक्षम अधिकारी घडतील सुरेशराव भुमरे

**परभणी (प्रतिनिधी):**

आई सेवाभावी संस्था संचलित ज्ञानज्योत निवासी गुरुकुल आयोजित शिवजन्मोत्सव, पालक मेळावा आणि विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना सिने नाट्य लेखक दिग्दर्शक प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी "छत्रपती शिवरायांचे धैर्य, शौर्य आणि न्यायप्रियता आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे," असे विचार व्यक्त केले.


कार्यक्रमाचे उद्घाटन भाजप जिल्हाध्यक्ष सुरेशराव भुमरे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, ज्ञानज्योत गुरुकुलात मिळणाऱ्या शिक्षणामुळे येथून भविष्यातील अत्यंत कार्यक्षम अधिकारी घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष हभप राम महाराज बनसोडे यांनी "ज्ञानज्योत गुरुकुल म्हणजे ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्काराचे भांडार आहे," असे प्रतिपादन केले. शिवव्याख्याती कु. आरोही खंदारे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत शिवविचारांचा जागर केला. समाजकल्याण सभापती पै. मारोतराव बनसोडे यांनीही आपले विचार मांडले. श्री सारंग स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस धन्यकुमार शिवणकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तर एपीआय शिंदे यांनी गुरुकुलचे संचालक प्रा. नवनाथ बनसोडे व विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक केले. प्रा. शिवदास काळबांडे यांनी आईवरील भावस्पर्शी गीत सादर करून सर्वांची मने जिंकली.

या सोहळ्याला पारदेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश शिंदे, सारंग स्वामी विद्यालयाचे मुख्याध्यापक




नारायण निलंगे, ज्ञानोपासक महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. लक्ष्मण बनसोडे, महाराष्ट्र पोलीस अशोक धरणे, जि. प. सदस्य रितेश काळे, युवासेना तालुका प्रमुख बंडू अप्पा बनसोडे, प्रा. बालाजी बनसोडे, जि. प. शिक्षक बिभीषण धरणे, अशोक तिडके, सुनील पुरी, हनुमान आव्हाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संचालक प्रा. नवनाथ बनसोडे यांनी गेल्या आठ वर्षांतील गुरुकुलची जडणघडण विशद केली.अनाथ-वंचित मुलांची शैक्षणिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. विद्यार्थ्यांनी आपली मनोगते आणि गीत गायनातून पालकांची मने जिंकली. शैक्षणिक, एनएमएमएस, सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. उद्घाटन सत्राचे प्रभावी सूत्रसंचालन डॉ. सिद्धार्थ तायडे तर गुणगौरव सोहळ्याचे बहारदार सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन इंग्रजी विषयाचे विद्यार्थीप्रिय शिक्षक प्रा. मदन ईदगे पाटील यांनी केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी संचालक प्रा. नवनाथ बनसोडे, प्रा. ऋतुजा बनसोडे, प्रा. मदन ईदगे, गायकवाड सर, बीडकर सर, मोगरे सर, हराळ सर, लांडे सर, थोरात सर, मुंजा बनसोडे, पांढरे सर, सचिन बनसोडे यांसह सर्व शिक्षक, शिक्षिका व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी, पालक आणि माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# गुणवत्तेत अग्रेसर राहून विद्यार्थीनी शाळेचा नावलौकिक करावा : मुख्याध्यापक शिवदास शेकडे

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल आणि आई,वडिलासह गावासोबत शाळेचे नाव मोठे करायचे असेल तर गुणवत्तेत अग्रेसर राहून विद्यार्थीनी शाळेचा नावलौकिक करावा.असे प्रतिपादन भैरवनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवदास शेकडे यांनी केले.

ते भैरवनाथ विद्यालयातून एनएमएमएस(NMMS) परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या रेणुका मोहन शेकडे,आयान शौकत पठाण या दोन विद्यार्थाच्या सत्कार सोहळ्या प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पत्रकार नितीन कांबळे शौकत पठाण यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की,ग्रामीण भागातील शाळा असताना देखील शिक्षकांच्या अभ्यासपूर्ण अध्यापनातून मुलांची शैक्षणिक गुणवत्ता चांगली झाली आहे.या कठीण परिक्षेत देखील विद्यार्था चमकू लागले आहेत. भविष्यात विद्यार्थी जिल्हा नव्हे राज्य पातळीवर जाऊन शाळेचे नाव मोठ करतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यावेळी भैरवनाथ विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मधुकर तांदळे,मुख्याध्यापक शिवदास शेकडे,सहशिक्षक अशोक तांदळे,बाळासाहेब राजगुरू,किसन शेकडे,कृष्णा शेकडे,प्रवीण तांदळे,दत्ता शिरसाठ, नारायण आंधळे,विश्वनाथ शेकडे, ग्रामपंचायत सदस्य आसमा शौकत पठाण याच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच अरणविहरा, तागडखेल,जोमदार तांड्यासह परिसरातील ग्रामस्थांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या..



## आठ वर्षीय अलीना शेख यांचा जीवनातील पहिला रोजा पूर्ण

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

पवित्र रमजान महिन्यानिमित्त परळी येथील आठ वर्षीय अलीना शेख हिने आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण करून सर्वांसमोर प्रेरणादायी आदर्श ठेवला आहे. अलीना ही ॲड. शेख एजाज यांची कन्या आहे. सध्या वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवरही अलीनाने दिवसभर पाण्याचा थेंब न पिता सुमारे १४ तासांचा कडक रोजा पूर्ण केला. तिच्या या जिद्दीचे व चिकाटीचे सर्वत्र कौतुक होत आहे. परळी येथील मित्रपरिवार, नातेवाईक तसेच विविध स्तरांतील नागरिकांकडून अलीनावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. लहान वयातच धार्मिक संस्कार आणि आत्मसंयम जपल्याबद्दल तिचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. अलीनाच्या या प्रयत्नामुळे कुटुंबियांचा आनंद द्विगुणित झाला असून, तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्वांकडून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# संस्कारांची गंगोत्री कविताच : प्रा.वा. ना.आंधळे

**पारोळा प्रतिनिधी**

संस्कार हा मानवी आयुष्याचा अविभाज्य भाग असून संस्काराने मानवी जीवनाला मूल्य प्राप्त होते.माणूस हा संस्कारांनी ओळखला जातो.ही संस्कारांची खाण कविता या साहित्य प्रकारातून मानवी आयुष्यात आलीय.ती कशी हे अनेक कवनांचे दाखले देत एरंडोल येथील सुप्रसिद्ध कवी प्रा.वा. ना.आंधळे यांनी पारोळा येथील बोहरा सेंट्रल स्कूल आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसमोर काव्यमहती

साधार मांडली. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.त्यावेळी व्यासपीठावर बोहरा सेंट्रल स्कूलचे संचालक मा. बोहराजी,प्राचार्या श्रीमती शोभा सोनी,मराठी विभाग प्रमुख सौ.मंजुषा पाटील व अन्य मराठी शिक्षिका भगिनींनी उपस्थिती होती.

ते आपल्या व्याख्यानात पुढे म्हणाले की,मराठीचे प्राचीनत्व आणि मराठी साहित्याची अनेक साहित्य प्रकारातून झालेली वाटचाल ही तिच्यातल्या अभिजाततेचे नितांत दर्शन घडवणारी आहे.असे सांगत श्रेष्ठ कवी वि.वा. शिरवाडकरांचे साहित्य योगदान हे आभाळउंचीचे असून समाजसमृद्धीसाठी ते ठायीठायी कामी आलेय.असे सांगत काही कवींच्या कवितांचे रंजन व प्रबोधन या दृष्टीने त्यांनी बहारदार सादरीकरण केले. यावेळी मराठीची थोरवी व महाराष्ट्राची थोरवी गाणाऱ्या गीतांवर विद्यार्थी विद्यार्थींनींनी विविध नृत्य सादर केलीत.याच समारंभात तेरा मराठी शिक्षिका भगिनींचा सत्कार प्रा. आंधळे यांचे शुभहस्ते करण्यात आला.अशा या भरगच्च समारंभाचे सूत्र संचलन व आभार प्रदर्शन बोहरा सेंट्रल स्कूलच्या विद्यार्थींनींनी केले.

## आखाती देशांमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना परत आणण्यासाठी मुख्यमंत्री स्वतः सक्रीय

**मुंबई :** अमेरिका इराणमध्ये गेल्या चार दिवसांपासून युद्धा सुरू आहे. अमेरिकेने 28 फेब्रुवारी रोजी इराणवर केलेल्या हल्ल्यात त्यांचे सुप्रीम लीडर आयातुल्ला खामेनी यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर त्यांच्या पत्नीचाही मृत्यू झाल्याची बातमी समोर आली आहे. याशिवाय इराणमधील संरक्षण मंत्री, आर्मी चिफ आणि गार्ड चीफसह 40 पेक्षा जास्त कमांडरही मारले गेले आहेत. अशातच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हे युद्ध चार आठवडे चालणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. अमेरिका आणि इराणमधील वाढत्या युद्ध संघर्षामुळे आता भारत दोन्ही देशात अडकलेल्या आपल्या नागरिकांना परत आणण्यासाठी प्रयत्न करत दिसत आहे. महत्त्वाचे म्हणजे आखाती देशांमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना परत आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः सक्रीय झाले आहेत